नि.फौ.प्र.क्र.१६/२०२४
सरकार -वि.- जगन नारखेडे+१३
**निशाणी क्र.३७९**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक २१ याची जबानी</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नांव - सचिन श्रीराम धाडे,

वय - ३० वर्षे, व्यवसाय – शेती,

रा. - म्हैसवाडी, ता. मलकापुर जि. बुलढाणा.

**<u>सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.आर.बी. देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....</u>**

०१. माझी शेती चिंचोड शिवारात असून ती चार एकर आहे. त्याचा गट क्र.८० आहे. सन २०२२ -२३ मध्ये मी माझ्या शेतात कपाशी पेरले होते. त्यावेळी उत्पन्न चाळीस क्वींटल झाले होते. मी तो चाळीस क्वींटल कापूस शामराव लाहुडकर यांना विकला. त्यावेळी भाव ९ हजार प्रति क्वींटल ठरला होता. कापूस मोजल्यावर मला ५० हजार शामराव लाहुडकर यांनी दिले होते व उर्वरित पैसे ४० दिवसानंतर द्यायचे ठरले होते. ते पैसे मला मिळाले नाही. त्यानंतर शामराव लाहुडकर याने जगन नारखेडेच्या घरी नेले. जगन नारखेडेने मला पैसे देतो असे म्हटले. परंतु पैसे मला मिळाले नाही. त्यानंतर मी तक्रार केली. मी शामराव लाहुडकर याला ओळखत होतो. त्याचे गाव माझ्या गावाजवळ आहे. मी जगन नारखेडेला ओळखत नव्हतो. शामराव लाहुडकरने मला तो जगन्नाथ नारखेडेसाठी काम करतो असे सांगितले होते. शामराव लाहुडकर आज न्यायालयात हजर नाही. जगन नारखेडे हा दृकश्राव्य पध्दतीने हजर आहे. त्याला दाखवले असता मी त्याला ओळखतो. मी तपासाकामी सातबारा व काटापावती पोलीसांना दिले होते. आता मला माझ्या शेताचा सातबारा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यास **<u>निशाणी क्र.३८०</u>** देण्यात आला. आता मला काटा पावती दाखविण्यात आली. ती तीच काटा पावती आहे. त्यावर माझे नाव आहे. सदर दस्ताच्या ओळखीपोटी त्यास **<u>निशाणी क्र.३८१</u>** देण्यात येतो. माझा कापूस दि.२६ जुलै २०२३ रोजी नेला होता.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१,४,११ व १२ तर्फे विधीज्ञ श्री.आर.एस.जगताप यांचेमार्फत सुरु.</u>**

०२. हे म्हणणे खरे आहे की, शेती ही माझ्या वडीलांच्या नावाने आहे. मी दिलेल्या

सातबा-यावर माझ्या वडीलांचेच नाव आहे व काटा पावतीवर माझे नाव आहे. माझ्या वडीलांनी कापसाचे पैसे न मिळाल्याबाबत तक्रार केलेली नाही. मी पोलीसांना बयाण देतेवेळी त्यानंतर शामराव लाहुडकर याने जगन नारखेडेच्या घरी नेले. जगन नारखेडेने मला पैसे देतो असे म्हटले. परंतु पैसे मला मिळाले नाही असे सांगितले होते. पोलीसांनी सदर बाब माझ्या बयाणात का लिहीली नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. तसेच मी पोलीसांना बयाण देतेवेळी शामराव लाहुडकर हा जगन नारखेडेसाठी काम करतो असे सांगितले होते. सदर बाब माझ्या बयाणात का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. पोलीसांना जबाब देतेवेळी गाडीचा क्रमांक सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी जगन नारखेडेशी प्रत्यक्षात व्यवहार केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे शामराव लाहुडकरसोबत संबंध चांगले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, शामराव लाहुडकर सोबत माझे संबंध चांगले असल्यामुळे जगन नारखेडेविरुध्द खोटी तक्रार दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, तसेच जबाबात व सरतपासात म्हटल्यापमाणे कोणतीच रक्कम देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर मी खोटा सांगत आहे व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.तांदुळकर यांचेमार्फत सुरु....</u>**

०३. माझा व्यवहार हा शामराव लाहुडकर याच्यासोबत झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, गावातले आजुबाजुचे अस ब-याच लोकांनी शामराव लाहुडकर याला कापूस विकला होता. हे म्हणणे खरे आहे की, मला सुरूवातीला जी रक्कम दिली ती शामराव लाहुडकरने दिली व ती रक्कम त्याच्यासोबत झालेल्या व्यावहारापोटी होती. हे म्हणणे खरे आहे की, नंतरची रक्कम शामराव लाहुडकरने मला व इतर लोकांना दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा शामराव लाहुडकर सोबत झालेल्या व्यवहारासोबत आजरोजी न्यायालयात हजर असलेल्या २ ते पुढील उर्वरित आरोपींशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा जो काही व्यवहार झाला तो शामराव लाहुडकरसोबतच झाला.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.५ तर्फे विधीज्ञ श्रीमती एन.के.डोसे यांचेमार्फत सुरु....</u>**

०४.  आरोपी क्र.१, ४, ११, १२, २ व ३ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकारण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.६,७, ९ व १४ तर्फे विधीज्ञ श्री.जी.डी.पाटील यांचे मार्फत सुरु....</u>**

०५.  आरोपी क्र.१, ४, ११, १२, २ व ३ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकारण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.८ तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.तायडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०६.  आरोपी क्र.१, ४, ११, १२, २ व ३ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकारण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१० तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.मोरे यांचेमार्फत सुरु....</u>**

०७.  आरोपी क्र.१, ४, ११, १२, २ व ३ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकारण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१३ तर्फे विधीज्ञ श्री.बी.एस.वानखेडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०८.  आरोपी क्र.१, ४, ११, १२, २ व ३ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकारण्यात आला.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2026.02.11 17:22:01 +0530

दिनांक : ११/०२/२०२६.

**( पी.एस.ठाकरे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर